जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.३१/०१/२०२४
## दि.३०/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे ३१/२०२४,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | आकाश कोकाटे,वय २९ वर्षे,रा.मंगळवार पेठ,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ३०/०१/२०२४ रोजी सकाळी ०८/०० वा. ते १७/३० वा.चे दरम्यान नमो हाईट्स,तिसरा मजला, प्लॅट नं.०६/ए,५६,मंगळवार पेठ,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख व सोन्याचे दागिने असा एकुण २,७३,४५७/- रु किमतीचा ऐवज दिवसा घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, संतोष शिंदे ९९२३४३३८२० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ४८/२०२४,भादविक २७९,३३८,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | अभिजीत दास,वय-३४ वर्षे,रा.गंगानगर,आकुर्डी,पुणे |
| **आरोपीत** | कारवरील चालक इसम (जखमी आहे.) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०१/२०२४ रोजी १५/०० ते १५/१५ वा.चे दरम्यान डुक्कर खिंडीच्या जवळ,वसुधा इटाशा सोसायटीचे समोर मुंबई-बंगलोर हायवे रोडवर वारजे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे अतंर्गत रोजंदारीवर काम करणारे दोन कामगार १)सनि नंदलाल गौड, वय-२३ वर्षे,सध्या रा.हारगुडे वस्ती,चिखली,पुणे मुळगांव-संग्रामपुर,सिध्दार्थनगर,उत्तर प्रदेश २) विजय बहादुर मटरु चौहान,वय-२८ वर्षे,सध्या रा.हारगुडे वस्ती,चिखली,पुणे,मुळगांव-घर नं.११२,जरियारी,दानगंज,चोलापुर,वाराणसी उत्तर प्रदेश हे मुंबई-बंगलोर हायवे रोडवरील आरसीसी क्रश बॅरीअरला रंग देण्याचे काम करीत असताना,यातील नमुद कार चालकाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी रंगकाम करणारे कामगारांना जबर ठोस मारून,ते हायवे रोडवरुन डाव्या बाजुस असणा-या सर्व्हीस रोडवर खाली पडून,त्यामध्ये दोघांना गंभीर जखमी करून,त्यांचे मृत्युस कारणीभुत झाला. तसेच सदर कारचालका सोबत असलेले सहप्रवासी गंभीररित्या जखमी झाले आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, ओलेकर ९९५८६३२१४५ / ७५०६०७२७११ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी-काळभोर पो स्टे ७१/२०२४,भादविक ३०४,(अ),३३८,२७९,४२७ मोवाका.कलम ११९/१७७ |
| **फिर्यादी** | श्रीमती.लक्ष्मी करण देडे,वय-२४ वर्षे,रा.गिरमे वस्ती,उरुळी कांचन,पुणे |
| **आरोपीत** | ट्रकवरील चालक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २७/०१/२०२४ रोजी २१/१५ वा.सोलापुर-पुणे रोडवर,बोरकर वस्ती,कुंजीरवाडी,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पती करण गुरूनाथ देडे,वय-३२ वर्षे,रा.सदर हे यातील नमुद इसम याचे ट्रक मधुन पुणे येथे हमाल म्हणुन सिमेंट खाली करण्यासाठी जात असताना,सदर ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी तो चालवत असलेल्या ट्रकवरील त्याचा ताबा सुटुन, त्याचा ट्रक पलटी होवुन,त्या ट्रक मधील करण देडे यांना गंभीर दुखापत करून,त्यांचे मृत्युस कारणीभुत झाला. तसेच सदर ठिकाणी असलेल्या महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीचे इलेक्ट्रीक रोहित्रास धडकुन त्याचे नुकसान केले आहे. (फिर्यादी यांनी मयताचे धार्मिक विधी करून आज रोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अमोल घोडके ८८८८८२२४०० / ८८८८८२४२०० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे ६७/२०२४,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | रुपेश वीसपुते,वय-४९ वर्षे,रा.यशवंतनगर,तळेगाव-दाभाडे,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०१/२०२४ रोजी रात्रौ १२/३० वा ते पहाटे ०५/०० वा.चे दरम्यान परशुराम अप्पासाहेब राजवाडे उद्यान,लक्ष्मीनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी परशुराम अप्पासाहेब राजवाडे उद्यान,लक्ष्मीनगर,पुणे येथे असलेल्या चंदनाच्या झाडापैकी एक चंदनाचे झाड,कोणीतरी अज्ञात इसमाने,कशाचेतरी सहाय्याने कापुन १५,०००/- रु किमतीचे चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | म.पोलीस अंमलदार, सी.बी.देवकाते ०२०/२४२२०२०५ |

## दि.३१/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३९/२०२४,भादविक ३०७,३२३,५०४,३४,महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | एक अल्पवयीन मुलगा,वय-१५ वर्षे,रा.झांबरे वस्ती,बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपीत** | १.एक इसम व त्याचे इतर तीन साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ३०/०१/२०२४ रोजी १५/३० वा.रामोशी गेट समोरील मशिदी जवळ,भवानी पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे शिकत असलेल्या,त्यांचे शाळेच्या आवारात असलेल्या एका हायस्कुल मध्ये शिक्षण घेत असलेला विदयार्थी अ.क्र.१ याने दिनांक २९/१/२०२४ रोजी ऐकमेकांकडे खुन्नसने पाहण्याचे कारणावरुन झालेल्या भांडणात फिर्यादी व अ.क्र.१ यांनी ऐकमेकांना मारहाण केली होती. त्याचा राग मनात धरुन,अ.क्र.१ व त्याचे इतर तीन साथीदार यांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन,मस्ती आयी है क्या,बहोत दादागिरी करता है क्या असे म्हणुन जीवे ठार मारण्याचे उद्देशाने लोखंडी रॉड,लोखंडी साखळी,लेदर बेल्ट व चाकुने फिर्यादी यांचे दोन्ही हातावर, मानेवर मारहाण करुन,चाकुने छातीचे उजवे बाजुस भोकसुन,फिर्यादीस गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अश्विनी पवार ९४०४३४६९७१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**